नि.फौ.ख. क्र. ११५/२०१८
<u>नि. क्र. ७६</u>

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२**
शपथेवर सत्य निवेदन करतो की,

**नाव** – **पिंटु उर्फ रघुनाथ वामन जाधव**
**वय** – ३७ वर्षे, **व्यवसाय**– शेती व वराह पालन,
**राहणार** – शिवशक्ती नगर, देगलूर रोड, उदगीर, ता.उदगीर, जि. लातूर.

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी विधिज्ञ श्री. के. टी. उगलमुगले यांचेमार्फत शपथेवर सुरू.</u>**

दिनांक २६/०२/२०१८ रोजी सकाळी ८.०० वाजण्याच्या सुमारास मी घरातून भाजी आणण्यासाठी कॅप्टन चौकातून गॅस एजन्सी समोरून भाजी मंडईत जात होतो. गॅस एजन्सीसमोर आलो असता दोन मोटार सायकलवर उमाकांत बापुन्ना सारोळे, बालाजी शंकर सारोळे, अशोक शंकर सारोळे, संदिप नरसिंग सारोळे आले व त्यांनी माझ्यासमोर दोन्ही मोटार सायकल उभ्या केल्या. त्यावेळी बालाजी सारोळे हा मला म्हणाला की, ''तु साईधाम निडेबन येथील प्लॉट का विकत नाहीस, तु निडेबनला यायचे नाहीस.'' त्यानंतर उमाकांत सारोळे यांनी त्यांच्या हातातील कत्तीने माझ्या उजव्या गुडघ्यावर वार करून जखमी केले. सदर कत्ती पाहिले असता मी ओळखू शकतो. आता मला कत्ती दाखविण्यात आली. ती तीच कत्ती आहे. सदर कत्तीस **मुद्देमाल वस्तु क्र.१** देण्यात येते. सदर कत्ती यापूर्वी उमाकांत सारोळे यांनी मला मारतेवेळी पाहिली होती.

२. संदिप सारोळे याने त्याच्या हातातील लॉन्चरने माझ्या पाठीत मारले. सदर लॉन्चर पाहिल्यास मी ओळखू शकतो. आता मला लॉन्चर दाखविण्यात आले. ते तेच लॉन्चर आहे. त्यास **मुद्देमाल वस्तु क्र.२** देण्यात येते. सदर लॉन्चर यापूर्वी संदिप सारोळे यांनी मला मारतेवेळी पाहिले होते. अशोक सारोळे याने त्याच्या हातातील काठीने माझ्या दोन्ही हातावर मारले.

आता मला दाखविण्यात आलेली काठी तीच आहे. सदर काठीस **मुद्देमाल वस्तु क्र.३** देण्यात येते. सदर काठी यापूर्वी अशोक सारोळे याच्या हातात मला मारताना पाहिली होती. त्या सर्वांनी मला जीवे मारण्याची धमकी दिली व ते निघून गेले.

**३.** सदर घटनेची माहिती तात्काळ मी माझ्या भावास व आईस मोबाईल फोनद्वारे सांगितले. मला चालता येत नसल्याने मी तेथेच बसलो होतो. काही वेळाने लाल बहादुर शास्त्री शाळेजवळ मारामारीचा आवाज आला. तेथे लोक जमा झाले होते. मी लंगडत लंगडत त्या ठिकाणी गेलो. तेथे जावून मी पाहिले असता सुरेश सारोळे याने त्याच्या हातातील कत्तीने माझा भाऊ प्रकाश यास डोक्यात मारून गंभीर जखमी केले होते. सदर कत्ती दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेली कत्ती तीच आहे. सदर कत्तीस **मुद्देमाल वस्तु क्र.४** देण्यात येते. यापूर्वी सदर कत्ती घटनेदिवशी सुरेश सारोळे याच्या हातात पाहिली होती. त्यावेळी माझी आई म्हणत होती की, ''माझ्या लेकराला मारू नका''. त्यावेळी नरसिंग सारोळे याने त्याच्या हातातील काठीने आईला मारले. सदर काठी पाहिल्यास ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेली काठी तीच आहे. सदर काठीस **मुद्देमाल वस्तु क्र.५** देण्यात येते. सदर काठी यापूर्वी घटनेवेळी नरसिंग सारोळे याच्या हातात पाहिली होती. त्यानंतर सुरेश सारोळे याने त्याच्या हातातील कुऱ्हाडीने आईला मारले. सदर कुऱ्हाड पाहिल्यास ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेली कुऱ्हाड तीच आहे. सदर कुऱ्हाडीस **मुद्देमाल वस्तु क्र.६** देण्यात येते. सदर कुऱ्हाड यापूर्वी घटनेवेळी सुरेश सारोळे याच्या हातात पाहिली होती.

**४.** त्या ठिकाणी माझा भाऊ संतोष आला होता. त्याला ज्ञानेश्वर सारोळे याने काठीने मारले. सदर काठी मुद्देमाल वस्तु क्र.५ येथे आहे. कमलबाई व शिवनंदा सारोळे यांनी माझ्या आईस लाथाबुक्क्यांनी मारहाण करून खाली पाडले. अंकुश सारोळे व राम

बापुन्ना सारोळे यांनी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. त्या ठिकाणी थांबलेल्या ऑटो चालकांनी सदर भांडणे सोडवून आम्हाला सरकारी दवाखान्यात नेले. दवाखान्यात उपचार घेत असताना पोलीस तेथे आले. त्यांचे नाव श्री. केंद्रे साहेब असे आहे. त्यांनी माझा जबाब नोंदवून घेतला. जबाब देण्याच्या परिस्थितीत मी होतो. आता मला दाखविण्यात आलेला जबाब तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्या जबाबास **नि.क्र.७७** देण्यात येते. आरोपी क्र.१ संदिप सारोळे हा न्यायालयात उपस्थित नाही. उर्वरित आरोपी न्यायालयात उपस्थित आहेत. आरोपी क्र. १ ते १० यांना पाहिल्यास मी ओळखू शकतो.

**५.** सन २०१८ मधील ५ तारखेला मला सरकारी दवाखान्यात पोलिसांनी बोलावून घेतले. सदर तारखेचा महिना मला सांगता येणार नाही. त्याप्रमाणे मी, माझे भाऊ प्रकाश, बालाजी, रघुनाथ, संतोष व आई दवाखान्यात गेलो. त्या ठिकाणी डॉक्टरांनी आमच्या सर्वांच्या रक्ताचे नमुने घेतले व ते सिलबंद केले. घटनेदिवशी घातलेले कपडे मी ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेला निळ्या रंगाचा शर्ट मी घटनेदिवशी घातलेला होता. त्या शर्टास **मुद्देमाल वस्तु क्र.७** देण्यात येते. सदर शर्ट पोलिसांनी माझ्याकडून तपासकामी जप्त केला होता. त्या शर्टावर रक्ताचे डाग होते. तेथील शर्टाचे तुकडे कट करून ते तपासणीकामी पाठविले आहेत. आता मला दाखविण्यात आलेली निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट मी घटनेदिवशी घातलेली होती. त्या पॅन्टीस **मुद्देमाल वस्तु क्र.८** देण्यात येते. सदर पॅन्ट पोलिसांनी माझ्याकडून तपासकामी जप्त केली होती. त्या पॅन्टवर रक्ताचे डाग होते. तेथील पॅन्टचे तुकडे कट करून ते तपासणीकामी पाठविले आहेत. मुद्देमाल वस्तु क्र.७ व ८ मी केंद्रे नावाच्या पोलिसांना दिले होते. त्यांनी ते तपासी अधिकारी श्री. ठाकूर साहेब यांच्याकडे दिले. त्यानंतर ठाकूर साहेब यांनी ते जप्त केले. माझा रक्तगट O+ आहे.

**सरतपास पूर्ण.**
**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. एच. आर. शेख यांच्यामार्फत सुरू.**

**६.** आरोपी माझे नातेवाईक नाहीत. माझे शिक्षण दहावी पास असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझा वराह पालनाचा व्यवसाय आहे. वराह पालनाचा व्यवसाय मी साधारण दहा वर्षांपासून करतो. त्या व्यवसायाचे ठिकाण उदगीर शहर हे आहे. सदर व्यवसायासाठी मी शासनाकडून परवानगी घेतलेली आहे. ती परवागनी कोणत्या साली घेतली ते साल मला सांगता येणार नाही. सदर परवानगी मी या प्रकरणात दाखल करू शकतो. वराह पकडत असताना आरोपीसोबत मतभेद झाले होते. त्यावेळी प्रतिष्ठीत लोकांनी आम्हांस समजावून सांगितले होते. सदर समजूत घालण्याचा प्रकार १० वर्षांत साधारण ७ ते ८ वेळा झालेला आहे. वराह पालन व्यवसायासाठी हद्दी निश्चित नसतात.

**७.** मला चार भाऊ आहेत. आमच्याविरूद्ध कोणतीही फौजदारी प्रकरणे दाखल नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वराह पालनाचा व्यवसाय दंडलशाहीने करतो.

**आरोपी तर्फे विधिज्ञांच्या विनंतीवरून उर्वरित उलट तपास दुपार सत्रापर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2025.11.21 17:54:18 +0530

**( के. ए. यादव )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) उदगीर

दिनांक :– २१/११/२०२५

**मध्यान्हानंतर आरोपी तर्फे विधिज्ञांमार्फत उर्वरित उलट तपास पुन्हा सुरू.**

८. माझ्या व आरोपी व्यतिरिक्त अनेक लोक वराह पालनाचा व्यवसाय करतात. १०० ते १५० वराहांची एकाचवेळी वाहतुक करता येते. सदरची वाहतुक टेम्पोतून केली जाते. ५ तारखेला साधारण २.३० वाजता मला दवाखान्यात बोलाविले होते.

९. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६/०२/२०१८ रोजी सकाळी ८.०० वाजता मी, माझा भाऊ संतोष, प्रकाश व बालाजी टेम्पोत वराह भरत होतो.

***(साक्षीदार तब्येत ठीक नसलेबाबत सांगत असल्याने व पुढील तारीख मागत असल्याने उर्वरित उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.)***

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2025.11.21 17:54:22 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA

**( के. ए. यादव )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२) उदगीर

दिनांक :– २१/११/२०२५